9/10

# राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
## बृहन्मुंबई खंडपीठ

माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

**अपील क्र. MHSICMU/२०२२/M/००४२१०**

**अपिलार्थी श्री. सुर्यप्रकाश दुबे**

**विरुद्ध**

**जन माहिती अधिकारी तथा अव्वल कारकून**
सक्षम प्राधिकारी - ३, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, मुंबई
ए विंग, पहिला मजला, प्रशासकीय इमारत,
अनंत काणेकर मार्ग, वांद्रे (पूर्व), मुंबई-५१

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा नायब तहसिलदार**
सक्षम प्राधिकारी - ३, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, मुंबई
ए विंग, पहिला मजला, प्रशासकीय इमारत,
अनंत काणेकर मार्ग, वांद्रे (पूर्व), मुंबई-५१

**द्वितीय अपील अर्ज सुनावणी दिनांक : २३.०८.२०२४**

अपीलकर्ता : उपस्थित
विद्यमान जन माहिती अधिकारी : अनुपस्थित (ट्रॅकिंग रिपोर्टप्रमाणे दि. ०७.०८.२०२४ रोजी नोटीस प्राप्त झाली आहे.)
प्रथम अपिलीय अधिकारी : अनुपस्थित (ट्रॅकिंग रिपोर्टप्रमाणे दि. ०७.०८.२०२४ रोजी नोटीस प्राप्त झाली आहे.)

| मूळ अर्ज दिनांक | जन माहिती अधिकाऱ्याचो उत्तराचा दिनांक | प्रथम अपीलदिनांक | प्रथम अपील आदेश दिनांक |
|---|---|---|---|
| २५.०१.२०२१ | २६.०२.२०२१ | ०८.११.२०२१ | ०८.१२.२०२१ |

अपिलार्थी यांनी आयोगाकडे दि. २८.११.२०२२ रोजीच्या अर्जान्वये द्वितीय अपील दाखल केले आहे.

सुनावणीच्या वेळी अपिलार्थी उपस्थित असून त्यांना असे सादर केले की, सदर प्रकरणी त्यांना माहिती मिळालेली नाही.

जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी कोणतीही सुचना न देता अनुपस्थित आहेत. कोणतेही आदेश पारीत करण्याअगोदर त्यांची उपस्थिती आवश्यक आहे. सदर प्रकरणी पुन्हा सुनावणी घेण्यात येईल. पुढील सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांनी आजच्या सुनावणीस अनुपस्थितीबद्दलच्या लेखी खुलाशासह उपस्थित रहावे.

**आदेश**

**सदर प्रकरणी पुढील सुनावणी दि. २३.०९.२०२४ रोजी सकाळी ११.०० वाजता घेण्यात येईल.**

State Information Commission Greater Mumbai

23-8-2024

**(डॉ. प्रदीप व्यास)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

मुंबई
दिनांक : २३.०८.२०२४

**अपील क्र. MHSICMU/२०२२/M/००४२१०**
**अपिलार्थी श्री. सुर्यप्रकाश दुबे**
**सुनावणी दिनांक : २३.०९.२०२४ (In continuation of order dt २३.०८.२०२४)**

| | | |
|---|---|---|
| अपीलकर्ता | : | अनुपस्थित(ट्रॅकिंग रिपोर्टप्रमाणे दिनांक ३१.०८.२०२४ रोजी नोटीस प्राप्त) |
| विद्यमान जन माहिती अधिकारी | : | उपस्थित |
| प्रथम अपिलीय अधिकारी | : | अनुपस्थित |

या प्रकरणी दिनांक २२.०८.२०२४ रोजी झालेल्या सुनावणीस अपिलार्थी उपस्थित होते. तथापि, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी कोणतीही सूचना न देता अनुपस्थित होते. म्हणून आयोगाने जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणीस अनुपस्थितीबद्दलच्या लेखी खुलाशासह दिनांक २३.०९.२०२४ रोजी सुनावणीस उपस्थित रहावे, असे आदेशीत केले होते.

उक्त आदेशानुषंगाने आजच्या सुनावणीस अपिलार्थी अनुपस्थित असून जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी यांनी मागील सुनावणीस अनुपस्थितीबाबत लेखी खुलासा सादर केला. तो अभिलेखावर घेण्यात आला.

सदर प्रकरणात प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दि.०८.१२.२०२१ रोजी असे आदेशीत केले होते की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस मागणी केल्याप्रमाणे परिशिष्ट -२ च्या संचिकेतील माहिती १५ दिवसांच्या आत उपलब्ध करुन द्यावी.

जन माहिती अधिकारी यांनी त्यांचे निवेदन दिनांक २३.०९.२०२४ आयोगास सादर केले. त्यांनी आयोगास निवेदन केले की, त्यांच्या माहितीप्रमाणे सदर सहकारी गृह निर्माण संस्था, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाशी संबंधीत नसल्यामुळे त्यांचे अभिलेखात माहिती उपलब्ध नाही. जन माहिती अधिकारी यांचे निवेदन व प्रथम अपिलीय अधिकारी यांचे आदेशामध्ये विसंगती आहे. सदर प्रकरणात स्पष्टता व्हावी म्हणून तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी व तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी आजच्या सुनावणीस ते का उपस्थित राहिले नाहीत, याबद्दलच्या लेखी खुलाशासह पुढील सुनावणीस उपस्थित रहावे.

**आदेश**

**या प्रकरणी पुढील सुनावणी दिनांक ०९ ऑक्टोंबर, २०२४ रोजी सकाळी ११.०० वाजता घेण्यात येईल.**

State Information Commission Greater Mumbai

23-9-2024

**(डॉ. प्रदीप व्यास)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**मुंबई**
**दिनांक : २३.०९.२०२४**

26 SEP 2024

७

**अपील क्र. MHSICMU/२०२२/M/००४२१०**
**अपिलार्थी श्री. सुर्यप्रकाश दुबे**

## सुनावणी दिनांक : ०९.१०.२०२४ (In continuation of order dt२३.०९.२०२४)

| | | |
|---|---|---|
| अपीलकर्ता | : | अनुपस्थित (ट्रॅकिंग रिपोर्टप्रमाणे दि. ०१.१०.२०२४ रोजी नोटीस प्राप्त झाली आहे.) |
| विद्यमान जन माहिती अधिकारी | : | उपस्थित |
| प्रथम अपिलीय अधिकारी | : | उपस्थित |

अपिलार्थी यांनी आयोगाकडे दि. २८.११.२०२२ रोजीच्या अर्जान्वये द्वितीय अपील दाखल केले आहे.

सदर प्रकरणी मागील सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी आयोगास निवेदन केले की, त्यांच्या माहितीप्रमाणे सदर सहकारी गृहनिर्माण संस्था, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाशी संबंधीत नसल्यामुळे त्यांचे अभिलेखात माहिती उपलब्ध नाही. जन माहिती अधिकारी यांचे निवेदन व प्रथम अपिलीय अधिकारी यांचे आदेशामध्ये विसंगती आहे. सदर प्रकरणात स्पष्टता व्हावी म्हणून तत्कालिन प्रथम अपिलीय अधिकारी व तत्कालिन जन माहिती अधिकारी यांनी आजच्या सुनावणीस ते का उपस्थित राहिले नाहीत, याबद्दलच्या लेखी खुलाशासह पुढील सुनावणीस उपस्थित रहावे असे आदेशित केले होते.

आजच्या सुनावणी वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. विद्यमान जन माहिती अधिकारी व तत्कालिन प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित असून प्रथम अपिलीय अधिकारी यांनी आयोगास निवेदन केले की, त्यांच्यासमोर प्रथम अपीलाची सुनावणी झाली तेव्हा जन माहिती अधिकारी यांनी संबंधीत संचिकाचे कार्यालयात शोध घेत असल्याचे निदर्शनास आणले म्हणून त्यांनी अपिलार्थींना संचिकेतील माहिती १५ दिवसांत देण्याचे आदेशित केले होते. विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी आयोगास निवेदन केले की, पूर्ण कार्यालयातील अभिलेख शोधले असता नस्ती उपलब्ध होत नाही म्हणून अपिलार्थींना नस्ती उपलब्ध करुन देता आली नाही.

जन माहिती अधिकारी यांनी अभिलेख शोधल्यानंतर नस्ती उपलब्ध होत नसल्याबाबतचे नोटराईज्ड प्रतिज्ञापत्र आयोगास सादर करावे व त्याची एक प्रत अपिलार्थींना पुरवावी. तसेच, महाराष्ट्र सार्वजनिक अभिलेख अधिनियम, २००५ नुसार एफआयआर नोंदविण्याची कार्यवाही करावी व केलेल्या कार्यवाहीच्या अनुपालन अहवालासह पुढील सुनावणीस उपस्थित रहावे.

**आदेश**

**सदर प्रकरणी पुढील सुनावणी दि. २२.११.२०२४ रोजी सकाळी ११.०० वाजता घेण्यात येईल.**

State Information Commission Greater Mumbai

**मुंबई**
**दिनांक : ०९.१०.२०२४**

9-10-2024

**(डॉ. प्रदीप व्यास)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**अपील क्र. MHSICMU/२०२२/M/००४२१०**

**अपिलार्थी श्री. सुर्यप्रकाश दुबे**

**सुनावणी दिनांक : २५.११.२०२४ (In continuation of order dt ०९.१०.२०२४)**

| | | |
|---|---|---|
| अपीलकर्ता | : | उपस्थित |
| विद्यमान जन माहिती अधिकारी | : | अनुपस्थित (ट्रॅकिंग रिपोर्टप्रमाणे दि. २८.१०.२०२४ रोजी नोटीस प्राप्त झाली आहे.) |
| प्रथम अपिलीय अधिकारी | : | अनुपस्थित (ट्रॅकिंग रिपोर्टप्रमाणे दि. २८.१०.२०२४ रोजी नोटीस प्राप्त झाली आहे.) |

सदर प्रकरणी मागील सुनावणीच्या वेळी आयोगाने जन माहिती अधिकारी यांनी अभिलेख शोधल्यानंतर नस्ती उपलब्ध होत नसल्याबाबतचे नोटराईज्ड प्रतिज्ञापत्र आयोगास सादर करावे व त्याची एक प्रत अपिलार्थींना पुरवावी. तसेच, महाराष्ट्र सार्वजनिक अभिलेख अधिनियम, २००५ नुसार एफआयआर नोंदविण्याची कार्यवाही करावी व केलेल्या कार्यवाहीच्या अनुपालन अहवालासह पुढील सुनावणीस उपस्थित रहावे असे आदेशित केले होते.

आजच्या सुनावणी वेळी अपिलार्थी उपस्थित असून जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

आयोगाच्या कार्यालयाने जन माहिती अधिकारी यांच्याशी दुरध्वनीव्दारे संपर्क केला असता जन माहिती अधिकारी यांनी असे कळविले की, विधानसभा निवडणुक २०२४ साठी त्यांची १५८ जोगेश्वरी विधानसभा कार्यालयात निवडणुक कामी नियुक्ती करण्यात आली असून त्यांना अजून कार्यमुक्त करण्यात आले नसल्याने ते आयोगासमोर सुनावणीस उपस्थित राहू शकले नाही. तरी त्यांना सुनावणीची पुढील तारीख देण्यात यावी ही नम्र विनंती.

सदर प्रकरणी पुन्हा सुनावणी घेण्यात येईल. पुढील सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी आयोगाने दिलेल्या दि. ०९.१०.२०२४ रोजीच्या आदेशाच्या अनुपालनासह उपस्थित रहावे.

**आदेश**

**सदर प्रकरणी पुढील सुनावणी दि. ०३.०१.२०२५ रोजी सकाळी ११.०० वाजता घेण्यात येईल.**

**(डॉ. प्रदीप व्यास)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**मुंबई**
**दिनांक : २६.११.२०२४**